साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

वर्ष 34 वे

करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

www.saptahiksandesh.com

**संस्थापक संपादक**
डॉ.अॅड.बाबूराव हिरडे

**संपादक**
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे

वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

आपल्या व्यवसायाची ऑनलाईन जाहिरात करण्यासाठी उपयुक्त ठिकाण
साप्ताहिक संदेश ऑनलाईन न्यूज पोर्टल
संपर्क 9822058106
संदेश ऑनलाईन न्यूज पोर्टल
www.saptahiksandesh.com
9822058106

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.१७ | पाने-१२ | दि.०३/०५/२०२४ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ४ रू.




# महायुती-महाविकास आघाडी दोघांचे प्रचार शिगेला - सभेपेक्षा पदयात्रेवर जोर

करमाळा : माढा लोकसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला असून, महायुती व महाविकास आघाडीच्या वतीने सभेपेक्षा पदयात्रेवर व घराघरात जाऊन मतदारांशी संपर्क साधण्यावर जोर दिला आहे. तालुक्यात राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे नेते शरद पवार यांचीच आत्तापर्यंत मोठी सभा झाली आहे.

माढा लोकसभेसाठी भाजपाकडून रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांना पुन्हा एकदा उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांच्या विरूध्द महाविकास आघाडीकडून धैर्यशील मोहिते-पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. दोन्ही उमेदवार तुल्यबळ असून करमाळा तालुक्यात जोरदार प्रचार सुरू आहे.

महाविकास आघाडीकडून दस्तुरखुद्द उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील, शितलदेवी मोहिते-पाटील, माजी आमदार नारायण आबा पाटील, जेऊरचे सरपंच पृथ्वीराज पाटील, माजी नगराध्यक्ष वैभवराजे जगताप, काँग्रेसचे नेते प्रतापराव जगताप,राष्ट्रवादीचे संतोष वारे, शिवराज जगताप, दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक प्रा.रामदास





झोळ तसेच आदिनाथचे माजी संचालक दशरथ कांबळे, सावंत गटाचे सुनील सावंत, शेतकरी संघटनेचे रविंद्र गोडगे, पश्चिम भागातून सुभाष गुळवे, जि.प.च्या माजी सदस्या सवितादेवी राजेभोसले, अमरजित साळुंके, डॉ.अमोल घाडगे, प्रा.शहाजीराव देशमुख, बंडू माने, महेंद्र पाटील, शिवसेनेचे तालुकाप्रमुख, सुधाकर लावंड, शहरप्रमुख प्रविण कटारिया, शाहुदादा फरतडे, अशाप्रकारे अनेक नेते व कार्यकर्ते प्रचारात कार्यरत आहेत.

महायुतीच्या वतीने उमेदवार रणजितसिंह नाईकनिंबाळकर, विद्यमान आमदार संजयमामा शिंदे व शिंदे समर्थक कार्यकर्ते, भाजपा जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे, तालुका अध्यक्ष रामा ढाणे, शहराध्यक्ष जगदीश आगरवाल, जितेश कटारिया, नरेंद्र ठाकूर, शशिकांत पवार, बाळासाहेब होसिंग, शाम सिंधी, नितीन झिंजाडे, सुहास घोलप व भाजप पदाधिकारी, बागल गटाचे नेते दिग्विजय बागल, रश्मी दिदी बागल तसेच जगताप गटाचे नेते शंभुराजे जगताप, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे व त्यांचे सहकारी. अशाप्रकारे दोन्ही गटाकडून प्रचाराची जोरदार मोहिम सुरू आहे. विशेष म्हणजे हे कार्यकर्ते घराघरात जाऊन मतदारांना भेटून प्रचार करत आहेत.

कडक उन्हाळा आणि दुष्काळाची छाया यामुळे प्रचार करणे कठीण जात आहे. तरीही हे कार्यकर्ते मोठ्या जोमाने प्रचार करत आहेत. शेवटच्या टप्प्यात नेमका कशा प्रकारचा प्रचार होणार यावरच उमेदवाराचे भवितव्य ठरणार आहे.



राजकारण ही गोष्ट समजण्यासारखी नसते ती समजून घ्यावी लागते....!

संपादकीय.............................................!

# लोकसभेचा झंजावात..!

लोकसभा निवडणुकींचा प्रचार अखेरच्या टप्प्यात आला आहे. येत्या ७ मे ला मतदान होत असून निवडणुक आयोगाने सर्व तयारी केली आहे. यावेळी तालुक्याचा निम्म्यापेक्षा जास्त भाग दुष्काळाने त्रस्त आहे. अनेक गावात टँकरने पाणी पुरवठा होत आहे, जनावरांच्या चाऱ्यांचा प्रश्न आहे, अशा स्थितीत येथील नागरीक या निवडणुकीच्या प्रचाराने त्रस्त न झाले तर आश्चर्य ! सध्या उन्हाचा तडाखा प्रचंड आहे, त्यामुळे प्रचार फक्त सकाळी आणि संध्याकळीच करावा लागला आहे. प्रचाराचे दिवस कमी त्यात उन्हाचा भडका, मध्येच सभेचा धडका, त्यामुळे सर्वच पक्षाच्या उमेदवाराला सर्व मतदारापर्यंत पोहोचता आले नाही, ही वस्तुस्थिती आहे. तरीही जमेल तसा प्रचार शहरात, खेड्यात, शेतात, घरात होत आला आहे. या कालावधीत निवडणुक आयोगाच्या सुचनेनुसार भ्रष्ट यंत्रणेला आवर घालण्यासाठीही सर्व प्रकारचे प्रयत्न सुरू आहेत. वेगवेगळ्या प्रकारची भरारी पथकं आहेत. कर्मचारी,अधिकारी व पोलीस यांना त्यात सामावून घेतले आहे. सतत शोध व तपासणी मोहिम राबवली आहे. तपासणी करताना एखाद्या व्यक्तीकडे ५० हजार रूपयापेक्षा जास्त रक्कम सापडल्यास त्याची चौकशी केली जाते. त्यात तो दोषी असलेतर त्याच्यावर व संबधित उमेदवारावर गुन्हा दाखल करण्याच्या तरतुदी केल्या आहेत. त्यामुळे गावात येणाऱ्या वाहनांची व व्यक्तींची कसून चौकशी केली जाते. याबरोबरच हॉटेल, धाबे, परमीटरूम यावरही निवडणूक आयोगाचे लक्ष आहे. असे असलेतरी आजचा जमाना हा झटपट जमाना आहे. मोबाईल, फेसबुक, इंटरनेट,व्हॉटस्‌ॲपचा वापर वाढला आहे. त्यामुळे बऱ्याच बाबी कशा घडतात, हे या भरारी पथकाच्या आवाक्या बाहेरचे आहे. तरीही पुर्वी जो उघड-उघड भ्रष्ट कारवाया चालायच्या ते यावेळी दिसले नाही. सध्यातरी या निवडणुकीत धाबे संस्कृतीला बराच आळा बसल्याचे दिसून येत आहे.

या निवडणुक प्रचारात अद्ययावतपणा आलेला आहे. यापुर्वी फक्त प्रिंट मिडीया व इलेक्ट्रॉनीक मिडीयाचा वापर केला जात होता. यावेळी प्रचारासाठी ध्वनीक्षेपक, जाहीर पत्रकं, टि.व्ही., वर्तमानपत्रात जाहीराती, नातेवाईकांचे माध्यम, पदयात्रा, घरा-घरात भेटी आणि सभा याबरोबरच फेसबुक, व्हॉटस्‌ॲप, मोबाईल मेसेज याचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातोय. अत्याधुनिक साधनाबरोबरच भाजपा व राष्ट्रवादी यांनी थोड्या प्रमाणात छोट्या सभाही घेलेल्या आहेत. त्यामुळे या तालुक्यातील मतदारांना शह-कटशह दिसून आलेला असलातरी टिकेतील विखारीपणा प्रत्यक्ष दिसून आला नाही. शेवटच्या टप्प्यात याबाबत कोण आघाडी घेतो ते लवकरच समजेल.

खरंतर करमाळा तालुक्यातील मतदार मताच्या बाबतीतही नेहमीच सतर्क असतो. तसं पाहाता मत म्हटलंतर बहुतेकांचं मत निवडणुक लागली व उमेदवार ठरला की आपले मत कोणाला द्यायचे हे ठरवलेले असते. त्यात फारसा बदल होत नसतो. मत ही एक मानसीक कृती आहे. कोणी कोणावर प्रेम करावे हे ठरवून होत नसते, कारण ती एक मानसीक कृती असते, मनाचा निर्णय आहे. त्याप्रमाणेच कोणी कोणाला मत द्यावे हे अंतरंगात,मनात ठरलेले असते. पण काही प्रसंगातून ते बदलते हे नाकारून चालत नाही. अनेकांना असे वाटते मत हे विकासासाठी पाहिजे, उमेदवाराची क्षमता पाहून, त्याचे चारित्र्य पाहून, त्याचे शिक्षण ज्ञान, अनुभव, वय, आजपर्यंतची त्याची असलेली वाटचाल पाहून मतदान करावे पण तसे घडत नाही. कारण मत हे मत देणाऱ्या माणसाच्या मानसिकतेने ठरवलेले असते. मग ते एखाद्या नेत्यावरील प्रेमामुळे, पक्षाच्या धोरणामुळे, उमेदवाराच्या कुवतीवरून अथवा स्वत: अनुभवलेल्या सुखद अथवा दु:खद अनुभवावरून तर कधी कधी प्रवाहाच्या लाटेवर बदलून जाते. नकाराची लाट अथवा भावनिक लाट आलीतर त्यात कितीही विकासा केला तरी मतदारांनी ठरवलेले मत बदलत नसते. एकदा ठरवलेले मत हे सभेने, जाहीरातीने, आवाहनाने सहसा बदलत नाही. असे बदलणारे मतदार खुपच अल्प असतात. मागील दोन निवडणुकीला असलेली मोदी लाट यावेळी दिसून आली नाही, या उलट भाजपाने शिवसेना-राष्ट्रवादी फोडली असे सर्वसामान्यांचे मत आहे. त्यामुळे त्याची सहानुभुती ठाकरे व शरद पवार यांना दिसून येते.

आणखी एक बाब म्हणजे समाजात काही प्रमाणात दारिद्रय आहे. अनेकजण दुसऱ्यावर अवलंबून असतात. त्यांना मिळणारे काम, मिळणारी मजुरी, कुंटूबाला मिळणारे अन्न, परिवारातील लग्ने, आजारपण, शिक्षण यासाठी ते कोणावर ना कोणावर अवलंबून असतात. त्यांची मते ते ज्यांच्यावर अवलंबून असतात त्यांच्या विचारावर ठरलेली असतात. ज्यांना पैशाची गरज आहे ते प्रलोभनावर आपले मत बदलतात. काही मते दहशत व स्थानिक समस्यावर बदलत असतात. उदा.. एखाद्याची पाईप लाईन एखाद्याच्या शेतातून जायची असेलतर तो म्हणतो, आमक्या तमक्याला मत दिलेतरच तुझी पाईप लाईन जावू देईल अन्यथा आयुष्यभर तसाच ठेवील किंवा एखाद्याच्या शेतातून रस्ता असेलतर तो म्हणतो आमक्या-तमक्याला मत दे नाहीतर तुझा रस्ता बंद. दुसऱ्या बाजुला आर्थिक नाड्या ज्याच्या ताब्यात असतात ते लोकही मतदान बदलवतात. ज्या लोकांना शासन दरबारातून मदत झालेली आहे असे लोक म्हणजे गावपातळीवर घरकुल योजनेत घर, मोफत विहीर,विहीरीवर मोफत विद्युतपंप , कर्जमुक्ती, शासनाचे दरमहा अनुदान मिळते असे लोक आपले मतदान कोणाला करायचे हे ठरवून ठेवतात. थोडक्यात काय तर मतदानाची प्रक्रिया ही व्यक्तीगत रूपातून अंतरंगात ठरलेली असते.

करमाळा तालुका हा तसा अन्य तालुक्यातील लोकापेक्षा वेगळा आहे. येथील मतदार सुज्ञ आहे. तो वरवरच्या बाबीला भुलत नाही, नेत्याच्या दबावावर चालत नाही, पुढारी सांगतील त्यांना मतदान करत नाही. येथील मतदार बऱ्यापैकी स्वयंभू झालेला आहे. जिल्हा परिषद-पंचायत समिती, नगरपालिका, बाजार समिती, ग्रामपंचायत, साखर कारखाना, विधानसभा अथवा लोकसभा या निवडणुकीत कोणाला मतदान करायचे हे मतदार ठरवतो. अनेक चमत्कार येथील मतदारांनी केले आहेत. विधानसभेला सतत आमदार बदलणारा येथील मतदार आहे. साखर कारखान्यात सत्तांतर करणारा मतदार आहे. मागे आघाडी तर्फे लक्ष्मणराव ढोबळे लोकसभेला उभे होते. त्यावेळी सर्व नेते एकत्र असूनही व शिवसेनच्या कल्पनाताई नरहिरे यांना मत्ताधिक्य दिले. विशेष म्हणजे करमाळा तालुक्याच्या मताधिक्यावरच त्या विजयी झाल्या होत्या. कोण उमेदवार कसा आहे ? कोण कामाचा आहे ? कोण बोलघेवडा आहे ? कोण मदतीला धावून येईल व कोण तालुक्याचा विकास करेल? याचा अंदाज बांधणारा येथील मतदार आहे. थोडक्यात काय तर कोण खरे बोलतो व कोण नादी लावतो याची जाणिव येथल्या मतदारात आहे. आपल्या मतामध्ये मोठी ताकद आहे व त्यातून आपण बदल घडवू शकतो याची माहिति असल्यामुळे येथला मतदार आपले मतदान चुकवत नाही. विशेष म्हणजे येथील युवक, महिला, यांच्यातली जागृकता मोठी महत्वाची आहे. इतरांना कोणीही भुलवू शकतो, फसवू शकतो, पण येथल्या लोकांना नाही. आमचा मतदार फसतो पण एकदाच पुन्हा फसत नाही. त्यामुळे या लोकसभा निवडणुकीत कितीही सभा झाल्या व कितीही प्रचारात पायपीट केलीतरी येथील मतदार सतर्क आहे. सन २०१४ ची निवडणुक अशीच गाजली राष्ट्रवादीकडून विजयसिंह मोहिते-पाटील स्वत: उभे होते. त्यांच्या विरूध्द स्वाभिमानी पक्षाचे सदाभाऊ खोत उभे होते. मोहिते-पाटील हे विजयी झाले असलेतरी करमाळा तालुक्यातून ते व त्यांचे समर्थक नापास झाले होते. करमाळा विधानसभा मतदार संघात खोत यांना ८१४८९ मते मिळाली तर मोहिते-पाटील यांना ६६८४६ मते मिळाली. या तालुक्यातून १४८२३ मताचे लिड खोत यांना पडलेले होते, तेच खोत गेल्या कित्येक महिन्यात करमाळ्याकडे फिरकले नाही,आतातर विरोधकावर इडी लावा म्हणत आहेत. सन २०१९ च्या निवडणुकीत विद्यमान आमदार संजयमामा शिंदे व विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्यात सामना झाला. त्यावेळी नाईक निंबाळकरांना करमाळा तालुक्यातून ५४७४२ मते तर शिंदे यांना ६५१३२ मते मिळाली होती. यावेळी दस्तुरखुद्द संजयमामा शिंदे हे नाईकनिंबाळकरांचा प्रचार करत आहेत. येथील नेते एका बाजुला व मतदार दुसऱ्या बाजुला असल्याचे चित्र अनेक निकालानंतर स्पष्ट झालेले आहे. यावेळी दोन्ही बाजुला नेते मंडळी बलवान आहेत. त्यामुळे कोण उमेदवार कामाचा व कोण देखाव्याचा याची जाणीव असणारा येथील मतदार अचुक काम करणार यात शंका नाही.

तरीही मतदार बांधवानो आपली करमाळा तालुक्याची स्वतंत्र ओळख आहे. या लोकसभेला केवळ करमाळेकर मतदान करणार नाहीत तर माढा, माळशिरस, पंढरपूर, सांगोला,माण, खटाव हे तालुके आपल्या बरोबर आहेत. त्यामुळे यावेळी आपले वेगळेपण दाखवण्यासाठी मताची टक्केवारी सर्वात जास्त आपल्या तालुक्याची व्हावी हे विसरून चालणार नाही. मत कोणाला द्यायचे हे तुमचे तुम्ही ठरवा पण मतदान करायचे व इतरांना मतदानासाठी प्रवृत्त करायचे हे काम नक्की करा. मतदान हे पवित्र दान आहे. मतदान करताना कोणत्याही भ्रष्टकृतीला फसू नका, भुलथापाला बळी पडू नका,आपल्या सद्सद्‌विवेक बुध्दीला स्मरून मतदान करा. आपल्या मनाचा कौल मान्य करून योग्य निर्णय घ्या. उद्याचा देश घडवण्याचे सामर्थ्य आपल्या मतात आहे. त्यामुळे या निवडणुकीत ते सामर्थ्य दाखवा आणि आपल्या मतातून करमाळ्याची जी खरी ओळख आहे ती यावेळी दाखवा, हीच अपेक्षा..!

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

## बुथ बैठकीच्या कामकाजाने
# ग्रामीण भागात कमळाचे वातावरण फुलले : गणेश चिवटे



करमाळा(सं.प्र.) : भारतीय जनता पार्टीच्या बुथ बैठकीच्या कामकाजाने करमाळ्यात ग्रामीण भागात कमळाचे वातावरण फुलले असल्याची माहिती भाजपाचे जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे यांनी दिली.

भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार खा.रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांच्या प्रचारार्थ जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे हे करमाळा तालुक्यात प्रत्येक गावात बुथ समितीच्या बैठका घेत आहेत. त्यांच्या बुथ बैठकीला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असून प्रत्येक गावात पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार व भाजपाचे विचार जनसामान्यां पर्यंत पोहोचत असल्याचे दिसून येत आहे. तसेच गावोगावी कमळ चिन्हाला पसंती मिळत आहे. यामुळे मतदान करणाऱ्यांची संख्या वाढणार आहे. गणेश चिवटे यांच्या आजवर करमाळा तालुक्यातील ७० ते ८० गावात विविध ठिकाणी बैठका संपन्न झाल्या आहे.

यावेळी श्री.चिवटे म्हणाले, की नाईकनिंबाळकर यांनी करमाळा तालुक्यात आत्तापर्यंत कोट्यावधी रूपयांची विकासकामे केली आहेत व पुढे ते रिटेवाडी, पोंधवडी चारी व मांगी तलावासारखे पाण्याचे प्रश्न मार्गी लावतील. यासाठी त्यांना पुन्हा खासदार करण्यासाठी भाजपाचे सर्व पदाधिकारी तालुक्यातील गावोगाव प्रचार करून त्यांना तालुक्यातून जास्तीत जास्त लीड देण्याचा प्रयत्न करणार असल्याचेही सांगितले.

## रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांचे प्रचारार्थ
# आ.संजयमामा शिंदे यांच्या गावभेट दौऱ्यास उत्स्फुर्त प्रतिसाद




करमाळा(सं.प्र.) : माढा लोकसभेचे उमेदवार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांच्या प्रचारार्थ आमदार संजयमामा शिंदे यांनी करमाळा तालुक्यातील पश्चिम भागाच्या २२ गावांचा प्रचार दौरा केला. या दौऱ्यास नागरीकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. या गावभेट दरम्यान आ.शिंदे यांनी पारेवाडी,केत्तूर नं.१, केत्तूर नं.२, पोमलवाडी, खातगाव, टाकळी, कात्रज, जिंती कोंढारचिंचोली, रामवाडी, कावळवाडी, भिलारवाडी, कुंभारगाव, हिंगणी, भगतवाडी, गुलमोहरवाडी, दिवेगव्हाण, सावडी, कोर्टी, विहाळ, वीट या गावांना भेट देऊन गावाच्या विकासासाठी मतदारांनी भाजपाचे उमेदवार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना मतदान करण्याचे आवाहन केले. पारेवाडी येथून दौऱ्यास सुरूवात झाली व या दौऱ्याचा समारोप वीट येथे झाला.

या गावभेट दौऱ्यात आ.शिंदे यांचेबरोबर पश्चिम भागातील सुर्यकांत पाटील, डॉ.गोरख गुळवे, सुहास गलांडे, ॲड.अजित विघ्ने, बाळकृष्ण सोनवणे, तानाजी झोळ, राजेंद्र धांडे,सुजित बागल, राजेंद्र बाबर, हनुमंत पाटील, शंकर जाधव, बी.एन.जाधव, ॲड.अशोक गिरंजे, अनिल शेजाळ, सरपंच पांडूरंग नवले, गणेश गुंडगिरे, अविनाश मोरे, बाजार समितीचे माजी संचालक औदुंबर मोरे, सरपंच गौरव झांजुर्णे, रयत क्रांतीचे जिल्हाध्यक्ष संतोष वारगड, अजित रणदिवे उपस्थित होते.



**प्रियंका आय केअर हॉस्पीटल**

पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600

उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र

- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर
- नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
- लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
- एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री

डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन

अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)

सिध्दीविनायक ऑप्टीकल्स (आमच्याकडे शास्त्रोक्त पध्दतीने बनविलेले अचूक नंबरचे चष्मे अर्जंट बनवून मिळतील)
पत्ता : बँक ऑफ इंडिया समोर, करमाळा. मो.9527268181 / 9860872619

**बंगला विकणे आहे**

मथुरानगरमधील 2BHK (११०० स्क्वे.फुट जागा व ११०० स्क्वे.फुट बांधकाम) बांधकाम असलेला बंगला योग्य किंमत आल्यास त्वरीत विकणे आहे.

संपर्क : मो.9689557710

# शहरातून महाविकास आघाडीला लीड देऊ : सुनील सावंत



करमाळा(सं.प्र.): करमाळा शहरातून महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांना मताधिक्य देऊ; असे आश्वासन सावंत गटाचे नेते सुनील सावंत यांनी दिले.

माढा लोकसभेचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या पत्नी शितलदेवी मोहिते-पाटील यांनी सावंत कार्यालयास भेट दिली. त्यावेळी श्री.सावंत बोलत होते. संपूर्ण सावंत परिवार व कार्यकर्त्यांनी सौ.मोहिते-पाटील यांचे स्वागत केले. पुढे बोलताना श्री.सावंत म्हणाले, की ही निवडणूक लोकशाही विरूध्द हुकूमशाही अशी असून यावेळी भाजपच्या उमेदवाराला जनता मतपेटीच्या रूपाने धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही. शेतकरी, कष्टकरी, मजूर यांना गेल्या दहा वर्षात भाजपने काय दिले, याचा अभ्यास करावा. भाजपने फक्त भांडवलदाराला हाताशी धरून लोकशाही धोक्यात आणण्याचे काम केले आहे. भाजपाचे खासदार हे कधीच करमाळ्यात सर्वसामान्य जनतेकडे फिरकलेच नाही, त्यामुळे हीच एकमेव संधी मतदार राजांकडे आलेली आहे; असेही सावंत यांनी सांगितले.

यावेळी माजी नगराध्यक्ष ज्ञानेश्वर मोरे, माजी उपनगराध्यक्ष दादासाहेब सावंत, संजय सावंत, फारूक जमादार, रविंद्र कांबळे, दिपक सुपेकर, गोविंद किरवे, अजीज तांबोळी, साधनाताई मंडलिक, वि.का. सोसायटीचे चेअरमन मनोज गोडसे, जयकुमार क्षीरसागर, खलील मुलाणी, देवा लोंढे, नागेश उबाळे व कार्यकर्ते उपस्थित होते.


डिस्काउंटच्या जमान्यामध्ये भव्य डिस्काउंटसह
फ्रेश मटेरियलची हमी फक्त एव्हरफ्रेश सुपरमार्ट मध्येच !

थंडा.. थंडा.. कुल.. कुल..

विविध प्रकारामध्ये 'फ्रेश व बेस्ट क्वॉलिटी'चे

**उन्हाळी पदार्थ**

गुलकंद । सब्जा बी। फुलराणी खडीसाखर । रोझवॉटर । गुलाब पाकळी । आईस्क्रीम पावडर फालुदा । ताक मसाला । जलजिरा पावडर । लेमन गोळी । कोकम सरबत । कोकम आगळ कैरी पन्हे । आवळा सरबत । रसना । ग्लुकोंडी । आमपन्ना पावडर । लिंबूपानी सरबत पावडर कोकनट वॉटर पावडर । आवळा कॅन्डी । मधातील आवळा कॅन्डी । मोर आवळा । रूहाब्जा

मॅप्रो सरबत/क्रश सर्व फ्लेवर (रोझ, मँगो, पायनापल, ऑरेंज, स्ट्रॉबेरी, खस, कोकम)

**लेमन गोळी व इतर फ्लेवर गोळ्या :** लेमन गोळी । ऑरेंज संत्री गोळी । पेपर मिंट गोळी पोलो गोळी । मँगो गोळी । कच्ची कैरी गोळी। पेरू गोळी । पान गोळी । काला खट्टा गोळी चिंच गोळी । मिक्स फ्रूट गोळी । कोको बटर गोळी (जुनी रावळगाव गोळी)

**नाचणीचे पदार्थ..**
- नाचणी
- नाचणी पीठ
- नाचणीचे पापड
- नाचणी बॉबी
- नाचणी डिस्को पापड
- नाचणी बिस्किट

| वस्तू | एमआरपी | डि.ऑफर |
|---|---|---|
| मॅप्रो क्रश/सरबत | रू.१८० | रू.१४४ |
| टाटा गोल्ड चहा १ कि. | रू.४७५ | रू.३९९ |
| प्लास्टीक पाणी बॉटल (अनब्रेकेबल) | रू.११५ | रू.४९ |

सदर कात्रण घेऊन येणाऱ्या ग्राहकांसाठी ऑफर्स *
ऑफर कालावधी : १ ते १५ एप्रिल २०२४

**पापड, सांडगे व लोणचेसाठी**
- मुगदाळ
- उडीददाळ
- मटकीदाळ
- पापड मसाला
- पापड आटा
- पापड खार
- मोहरीदाळ
- लोणचे मसाला
- मेथी
- कारळं

सर्व ब्रॅन्डेड वस्तूंच्या छापील किंमतीवर कमीत कमी 10% डिस्काउंट

टीप : डिस्काउंट ऑफर, नियम व अटी समजावून घेण्यासाठी एव्हरफ्रेश सुपरमार्टला भेट द्या !

॥ नावाप्रमाणेच सर्व काही फ्रेश ॥
**एव्हरफ्रेश सुपरमार्ट**
॥ प्रिमियम क्वॉलिटी ॥ ॥ भरघोस डिस्काउंट ॥

*नियम व अटी लागू

किराणा । मसाले । प्रिमियम ड्रायफ्रुट्स् । बिस्कीटस् । नमकीन ॲन्ड स्वीटस् । बेकरी ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस् । । नॅचरल प्रॉडक्टस् । पर्सनल, होम ॲन्ड बेबी केअर । आयुर्वेदिक वस्तु । पुजेचे साहित्य

पंढरपूर अर्बन बँके समोर, दत्तपेठ, करमाळा. मो.7059293031

स्व.शिवाजी जगताप गुरूजी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ

# जिल्हापरिषद शाळा पांडे येथे प्रथम स्कॉलरशिपचे वितरण



करमाळा(सं.प्र.) : स्व.शिवाजी विष्णूपंत जगताप गुरूजी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ जिल्हापरिषद शाळा पांडे येथे प्रथम स्कॉलरशिपचे वितरण करण्यात आले.

ज्या शाळेत गुरुजींनी शिक्षण घेतले त्याच शाळेचे मुख्याध्यापक होण्याचे भाग्य त्यांना लाभले. बरीच वर्षे याच शाळेत त्यांनी सेवा बजावली. आपल्या कडक शिस्तीच्या आणि विद्यार्थी केंद्रीत शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी शिक्षणसेवा केली. त्यांच्या आठवणी कायम स्मरणात राहाव्यात व विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी प्रेरणा आणि सहाय्य मिळावे; या हेतूने ही स्कॉलरशिप सुरु करण्यात आली आहे. या स्कॉलरशिपचे स्वरूप कायमस्वरूपी ठेवण्यात येत असून त्याची व्याप्ती आणखी वाढवण्याचा मानस जगताप कुटूंबियांनी व्यक्त केला. विशेष बाब म्हणजे इ.७ वी ला पहिल्या आलेल्या विद्यार्थ्यांसाठी व मुलींमधून पहिल्या आलेल्या विद्यार्थीनींसाठी ही स्कॉलरशीप दिली जाणार आहे. पहिल्याचवर्षी विशेष योगाने पंत परिवारातीलच गुरुजींची नात कु.गौरी सचिन जगताप हिला वर्गात प्रथम क्रमांक मिळवून ही स्कॉलरशीप मिळाली. तसेच मुलींमधून समीक्षा सुभाष मेंढापूरे हिची निवड झाली. या वितरण समारंभ प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक, गावातील प्रतिष्ठीत मान्यवर, जगताप कुटूंबिय उपस्थित होते.

# राज्यस्तरीय एटीएसइ प्रज्ञाशोध परीक्षेत इरा पब्लिक स्कुलचे यश

करमाळा(सं.प्र.) : एटीएसइ-२०२४ या राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत उज्वल यशाची परंपरा कायम राखत चिखलठाण येथील इरा पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश प्राप्त केले आहे.

प्रशालेतील एटीएसइ परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी पुढीलप्रमाणे.. **इ.१ ली :** आराध्या समाधान सरडे (केंद्रात १ ली, जिल्ह्यात ७ वी, राज्यात १० वी), स्नेहल गुंड (केंद्रात २ री, जिल्ह्यात १५ वी, राज्यात १८ वी). **इ.२ री :** सुहानी गव्हाणे (जिल्ह्यात २ री, राज्यात ९ वी). **इ.३ री :** आरव लबडे (जिल्ह्यात ४ था, राज्यात ११ वा), श्रेया गुंड (जिल्ह्यात ५ वी, राज्यात १२ वी), माही बारकुंड (केंद्रात १ ली, जिल्ह्यात १३ वी, राज्यात २० वी). **इ. ४ थी :** अनुष्का लबडे (केंद्रात १ ली, जिल्ह्यात ९ वी, राज्यात १६ वी), रेहान तांबोळी (केंद्रात २ रा, जिल्ह्यात २१ वा, राज्यात २८ वा). या परीक्षेत इरा पब्लिक स्कुलमधील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून शंभर टक्के निकाल लागला आहे. सर्व एटीएसइ परीक्षेतीलल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष डॉ.बारकुंड व मुख्याध्यापक कसबे यांनी केले.

# मकाई कारखान्याच्या खात्यावर ४२ कोटी जमा

## २८ कोटी ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार !

करमाळा(सं.प्र.) : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून मकाई कारखान्याला ५५ कोटी रूपये कर्ज उपलब्ध झाले असून यापैकी ४२ कोटी रूपये कारखान्याच्या खात्यावर जमा झाले असून ऊस उत्पादक यांचे २८ कोटी रूपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे; अशी माहिती मकाई कारखान्याचे चेअरमन दिनेश भांडवलकर यांनी दिली. याबाबत बोलताना भांडवलकर म्हणाले, की मकाई कारखाना आर्थिक अडचणीत आला होता. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे दोन वर्षापासून ऊसाचे बिल देणे प्रलंबित होते. खा.रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या विशेष प्रयत्नामुळे ही रक्कम उपलब्ध झाल्यामुळे सर्व थकीत शेतकऱ्यांना दोन दिवसात पैसे मिळणार आहेत. सध्या जवळपास ५० टक्के शेतकऱ्यांचे खात्यात पैसे जमा झाले आहेत. लवकरच मकाई कारखान्याच्या हंगामी व कायमस्वरूपी कामगारांचे पैसे देण्याची प्रक्रिया दोन दिवसात निर्णय घेऊन करणार आहे. २३०० रूपये प्रतिटनाप्रमाणे शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा झाले असल्याचेही श्री.भांडवलकर यांनी सांगितले.


> गेली दोन वर्षापासून ऊस बिला संदर्भात आंदोलन करत होतो. आज शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा होत आहेत. मात्र एफआरपी कायद्यानुसार दोन वर्षाचे शेतकऱ्यांचे रकमेचे व्याज तात्काळ देण्याची घोषणा चेअरमन भांडवलकर यांनी करावी. तसेच सर्व कर्मचाऱ्यांच्या थकीत पगारी करून टाकाव्यात. तसेच कर्ज प्रकरणातील शिल्लक रकमेचा वापर मकाईच्या शेतकऱ्यांसाठी करावा.
>
> ...ॲड.राहुल सावंत (मा.सदस्य, पं.स.)

# चिखलठाण येथील कोटलिंग देवाची यात्रा उत्साहात संपन्न



करमाळा(सं.प्र.) : सर्व जाती धर्माच्या लोकांचे श्रध्देचे स्थान असलेल्या चिखलठाण येथील कोटलिंग देवाची यात्रा उत्साहात संपन्न झाली. तीन दिवस चालणाऱ्या या यात्रेत सोलापूर, सातारा, पुणे, नगर, धाराशिव जिल्ह्यातील हजारो भाविक सहभागी झाले होते.

तत्पूर्वी बुधवारी पहाटे शेटफळ येथील मानाच्या कावडीने व इतर कावडींनी धार घातल्यानंतर आरती होऊन यात्रा उत्सवाला सुरुवात झाली. रात्री बारा वाजता कोटलिंगनाथाचं चांगभलंचा जयघोष करत गुलाल व खोबऱ्याची उधळण करीत छबीना मिरवणूक काढण्यात आली. यात्रेनिमित्त मंदिर परिसरात नयनरम्य विद्युत रोषणाई करण्यात आली होती. भाविकांच्या सोयीसाठी राज्य परिवहन महामंडळाने जादा बसची सोय केली होती. आरोग्य विभागाच्या वतीने प्राथमिक उपचार व रूग्णवाहिकेची सोय करण्यात आली होती. महावितरणच्या वतीने सुरळीत वीजपुरवठ्याची व्यवस्था करण्यात आली होती. यात्रा कालावधीमध्ये पोलीस निरीक्षक विनोद घुगे, करमाळा पोलीस स्टेशनचे सर्व अधिकारी, कर्मचारी, राज्य राखीव पोलीस दल व गृहरक्षक दलाचे जवान यांनी बंदोबस्त ठेवला होता.

साई
स्टील रेलिंग
& किचन ट्रॉलीज्
सर्व प्रकारचे
स्टील रेलींग, मेनगेट
किचन ट्रॉलीची सर्व कामे
खात्रीशीर व वेळेवर
करून मिळतील.


प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502
पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.

सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी २०० रू.

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे
करमाळा तालुका वितरक
Ambuja Cement
• बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
• प्लंबींग • हार्डवेअर
होलसेल व रिटेल
योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.

## धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या प्रचारार्थ बैठक

# धनशक्तीला धुडकावून जनशक्तीला मतदानरूपी आशिर्वाद द्यावेत : शितलदेवी मोहिते-पाटील

करमाळा(सं.प्र.): भाजपाच्या धनशक्तीला धुडकावून जनशक्तीला मतदानरूपी आशिर्वाद द्यावेत; असे प्रतिपादन शितलदेवी मोहिते-पाटील यांनी केले.

माढा लोकसभेचे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या प्रचारार्थ जगताप गटाचे माजी नगराध्यक्ष वैभवराजे जगताप यांनी आयोजित कार्यकर्त्यांच्या बैठकीत सौ.मोहिते-पाटील बोलत होत्या. बैठकीच्या अध्यक्षस्थानी माजी नगरसेवक ज्ञानदेव फंड हे होते. पुढे बोलताना सौ.मोहिते-पाटील म्हणाल्या, की सहकार महर्षी कै.शंकरराव मोहिते-पाटील व देशभक्त कै.नामदेवराव जगताप यांचे तात्विक मतभेद होते, पण विकासाच्या मुद्यावर जिव्हाळ्याचे संबंध होते. तद्नंतर माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील व माजी आमदार जयवंतराव जगताप यांचे जवळचे संबंध पूर्वीपासून आहेत. आमच्या कुटूंबाबद्दल त्यांना आपुलकी असून आम्हालाही जगताप कुटूंबियाबद्दल स्नेह आहे. यावेळी माजी नगराध्यक्ष वैभवराजे जगताप यांनी मोहिते-पाटील यांना मताधिक्य देण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन पिंटूशेठ कटारिया यांनी केले. यावेळी जगताप गटाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## नाईकनिंबाळकर यांच्या प्रचारार्थ व्यापाऱ्यांची बैठक

# नाईकनिंबाळकर यांना निवडून देऊन मोदी यांना पंतप्रधान करण्याचा निश्चय





करमाळा(सं.प्र.) : शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांच्या नेतृत्वाखाली करमाळा येथे भाजपाचे उमेदवार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांच्या प्रचारार्थ करमाळा शहरातील सर्व व्यापाऱ्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीला आमदार संजयमामा शिंदे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी किराणा असोसिएशनचे अध्यक्ष सोमनाथ चिवटे, बाजार समिती व्यापारी संघाचे अध्यक्ष विजय दोशी, उद्योगपती सुनिल लुणिया, सराफ संघटनेचे राधेशाम देवी, खते बी-बियाणे अध्यक्ष महावीर सोळंके, पियुष गांधी, कापड व्यापारी असोसिएशनचे पप्पूशेठ सिंधी, विकास कटारिया, अशोक दोशी, दिपक कटारिया, पांडूरंग भिंगारे, बाळू बागडे, संजय ओतारी, सुर्यकांत चिवटे, अनिल वाशिंबेकर, हॉटेल व्यावसायिक पप्पू सय्यद, फळ विक्रेते संघटनेचे अध्यक्ष अलिम बागवान, राजू बागवान, इलेक्ट्रीक संघटनेचे अतुल दोशी, उत्कर्ष गांधी, किटकनाशके विक्रेते प्रदीप देवी, पीव्हीसी पाईप विक्री संघटना अध्यक्ष रूद्रा चोपडे, सूरज कांबळे, उपाध्ये काका, फरशी विक्री संघटनेचे रवी संचेती, यश कलेक्शनचे राजकुमार दोशी, अशोकशेठ दोशी आदी प्रतिष्ठित व्यापारी उपस्थित होते. यावेळी उपस्थित सर्व व्यापाऱ्यांनी एकमुखी नाईकनिंबाळकर यांना निवडून देऊन नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करण्याचा निश्चय केला.

# हिसरे येथील ग्रामस्थांचा नारायण पाटील गटात प्रवेश

करमाळा(सं.प्र.) : हिसरे येथील उपसरपंच, सदस्य व ग्रामस्थ यांचा आमदार संजयमामा शिंदे गटाला रामराम ठोकून माजी आमदार नारायण पाटील गटामध्ये प्रवेश झाला. त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी हिसरे गावचे उपसरपंच मोहन जगदाळे, गणेश जगदाळे, राजकुमार साळुंके, तात्यासाहेब जगदाळे, सचिन जगदाळे, संतोष जगदाळे, संजय जगदाळे, दादा लोंढे, महादेव जगदाळे, अनिल जगदाळे, अविनाश ननवरे, भारत विटकर, अरूण सातपुते, जयराम सोरटे आदी उपस्थित होते.


**आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर**

रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
● सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
fastrack
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
**श्री कमलादेवी ऑप्टीकल्स** नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२



**खुशखबर** मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर-बारामती-सोलापूर **खुशखबर**

बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
**डॉ.विकास देविदास नागरगोजे** (एम.एस.मुंबई)

आता आपल्या **करमाळ्यात !**

**उपलब्ध सुविधा...**
● मुळव्याधवर इंजेक्शन ● डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब
● एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब
● संडासवाटे रक्त येणे, पु येणे ● संडासची जागा बाहेर पडणे
● संडास जागी खाज व आग होणे ● संडासाचा नागवेडा
● संडास नंतर बसण्यास त्रास होणे ● भगंदर, फिशर
● चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)

**ओपीडी /ऑपरेशन ठिकाण**
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
**लोकरे हॉस्पिटल**
कृष्णाजीनगर, बायपास रोड
करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)

परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई

**विशेष सुचना...**
१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य.
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.

नाव नोंदणीसाठी संपर्क
मो.9763035862

बार्शी **धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल** कोर्ट समोर, बार्शी.


# पुरस्कारामुळे माणसाला काम करण्यासाठी नवीन ऊर्जा वाढते : मनोज राऊत



करमाळा(सं.प्र.): जीवन जगत असताना आपण केलेल्या कामाची पोचपावती समाजाकडून पुरस्काराने मिळत असते. या पुरस्कारामुळे माणसाला काम करण्यासाठी नवीन ऊर्जा वाढते. अशा कर्तृत्ववान लोकांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी ज्येष्ठ पत्रकार राजा माने यांच्या कार्य गौरव पुरस्काराचा करमाळा डिजीटल मिडीया पत्रकार संपादक संघटनेचा उपक्रम कौतुकास्पद आहे; असे मत गटविकास अधिकारी मनोज राऊत यांनी व्यक्त केले.

करमाळा डिजीटल मिडीया पत्रकार संपादक संघटनेच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार राजा माने कार्य गौरव पुरस्कार सोहळा गुरू गणेश दिव्यरत्न गोपालन संस्था येथे संपन्न झाला. त्यावेळी श्री.राऊत बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार राजा माने हे होते. प्रमुख पाहुणे म्हणनू तहसीलदार शिल्पाताई ठोकडे, पोलीस निरीक्षक विनोद घुगे, मुख्याधिकारी सचिन तपसे, यांचेसह डिजीटल मिडीया संघटनेचे राज्य उपाध्यक्ष सतीश सावंत, जिल्हाध्यक्ष प्रविण नागणे उपस्थित होते.

करमाळा डिजीटल मिडीया पत्रकार संपादक संघटनेच्या वतीने गुरूंच्या प्रति असलेला प्रेमभाव, समर्पण भाव, गुरूचा अनमोल ठेवा प्रत्येकाच्या जीवनात रहावा; या भावनेतून राज्यात प्रथमच ज्येष्ठ पत्रकार राजा माने कार्य गौरव पुरस्काराची सुरूवात केली; असे अध्यक्ष व पत्रकार दिनेश मडके यांनी सांगितले. या कार्यक्रमात शैक्षणिक, सामाजिक अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा ज्येष्ठ पत्रकार राजा माने कार्य गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला. यामध्ये सामाजिक कार्यकर्ते श्रेणिक खाटेर, शैक्षणिक कार्याबद्दल दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.रामदास झोळ, प्रा.डॉ.महेश निकत, ॲड.अजित विघ्ने व भीष्माचार्य चांदणे यांना यांना जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला. याबरोबरच करमाळा तालुक्यातील पत्रकार बांधवांचाही गौरव ज्येष्ठ पत्रकार राजा माने यांचे हस्ते करण्यात आला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी करमाळा डिजीटल मिडीया पत्रकार संपादक संघटनेचे तालुका अध्यक्ष दिनेश मडके, उपाध्यक्ष शितलकुमार मोटे, सचिव नरेंद्रसिंह ठाकूर, प्रसिध्दीप्रमुख अंगद भांडवलकर, व्यवस्थापक सुर्यकांत होनप, सदस्य राहुल रामदासी, संघटक ज्ञानदेव काकडे यांनी परिश्रम घेतले. सुत्रसंचालन नितीन चोपडे यांनी केले तर स्वागत नरेंद्रसिंह ठाकूर यांनी केले तर आभार आशपाक सय्यद यांनी मानले.

**सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी २०० रू.**

Shri Bhiravnath Pratishthan Sanchalit

# JAYPRAKASH BILE PUBLIC SCHOOL

ZARE, TAL- KARMALA, DIST- SOLAPUR



**State level Indian Abhirup Scholarship Exam (IAS) Jan - 2024 (English Medium)**

**राज्यस्तरीय शासनमान्य भारतीय अभिरूप शिष्यवृत्ती परीक्षा जाने.-२०२४ (इंग्रजी माध्यम)**

**Rank - I** (Class-I)



Vignesh Kadage

**Rank - I** (Class-II)



Nirmit Salunke

**Rank - 3** (Class-II)



Anwi Ghorpade

**Rank - 4** (Class-II)



Dhruv Jadhav

**Rank - 5** (Class-II)



Utkarsh Manjratkar

**Rank - 1** (Class-IV)



Pranjal Gulve

राज्यस्तरीय शासनमान्य
भारतीय अभिरूप शिष्यवृत्ती परीक्षेत (IAS) यश प्राप्त केलेल्या
जयप्रकाश बिले पब्लिक स्कुल मधील
**यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !**

**Rank - II** (Class-IV)



Dhairyshil Bile





6 May 2024

३९ वे

# पुण्यस्मरण

ऐसा जन्म लाभावा,
देहाचा चंदन व्हावा
आयुष्य संपले तरी
'साहेब' आपला सुगंध
दरवळत रहावा !

आमच्या संस्थेचे संस्थापक

**देशभक्त नामदेवरावजी जगताप साहेब**

३९ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त त्यांचे पवित्र स्मृतीस..


**भावपूर्ण आदरांजली !**

अभिवादक

**महात्मा गांधी माध्यमिक, उच्च माध्यमिक व तांत्रिक प्रशाला, करमाळा**

श्री.पी.ए.कापले (प्राचार्य), श्री.ए.एच.बागवान(उपप्राचार्य), श्री.बी.के.पाटील (पर्यवेक्षक), सौ.सुनिता नवले मॅडम (पर्यवेक्षिका), श्री.व्ही.एल.पवार (उच्च माध्य.विभागप्रमुख)

सर्व शिक्षक-शिक्षिका व कर्मचारी वृंद


सोलापूर जिल्ह्याचे थोर सुपुत्र, करमाळा तालुक्याचे शिल्पकार
माजी आमदार व स्वातंत्र्यसैनिक
देशभक्त नामदेवरावजी जगताप साहेब
यांच्या दि.६ मे रोजी असलेल्या
३९ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त त्यांचे पवित्र स्मृतीस
भावपूर्ण आदरांजली !
अभिवादक
कै.नामदेवराव जगताप सेवाभावी मंडळ, करमाळा संचलित
श्री भैरवनाथ माध्यमिक विद्यालय, जातेगाव
(मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद)


CELEBRATE
AKSHAY TRITIYA
WITH EXCLUSIVE
DESIGNS
BIS - 916
विश्वसनीय
दालन
सोनी
ज्वेलर्स
रवि सोनी
(9421029869)
अजित सोनी
(9423336932)
916 हॉलमार्क सोने-चांदी
व राशी खड्यांचे व्यापारी !
पत्ता : मेनरोड, करमाळा.


श्री कमलादेवी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
गुरूकुल पब्लिक स्कुल
सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात झालेल्या
राज्यस्तरीय A.T.S. परीक्षेत यश मिळविलेल्या
७४ विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !
इ. १ ली राज्यस्तरीय
इ. २ री राज्यस्तरीय
इ. ४ थी राज्यस्तरीय
इ. १ ली जिल्हास्तरीय
इ. १ ली केंद्रस्तरीय
इ. २ री जिल्हास्तरीय
इ. २ री केंद्रस्तरीय
इ. ४ थी जिल्हास्तरीय
इ. ४ थी केंद्रस्तरीय
इ. ५ वी जिल्हास्तरीय
इ. ५ वी केंद्रस्तरीय
इ. ६ वी केंद्रस्तरीय
इ. ७ वी केंद्रस्तरीय
-: शुभेच्छुक :-
गुरूकुल पब्लिक स्कुल,
मुख्याध्यापक, शिक्षक,
शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद,करमाळा

# आदर्श केंद्रप्रमुख महादेव यादव सेवानिवृत्त



करमाळा(सं.प्र.) : आदर्श केंद्रप्रमुख महादेव यादव हे ३० एप्रिल रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत ३८ वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावली आहे. त्यानिमित्त त्यांचा देवळाली केंद्रात जिल्हापरिषद शाळेत सेवानिवृत्ती-निमित्त सत्कार आयोजित करण्यात आला.

महादेव यादव गुरूजी हे करमाळा येथील रहिवाशी असून, त्यांनी शिक्षणा-बरोबरच अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहेत. शाळेच्या कामकाजावर कोणताही परिणाम न होता, त्यांनी अनेक समाजपयोगी कामे राबवली आहेत. तसेच अनेक विद्यार्थीही चांगल्याप्रकारे घडविले आहेत. सुरूवातीला ते पारेवाडी येथे रूजू झाले होते. त्यानंतर झरे, कामोणे, माळशिरस, हिवरवाडी व शेवट देवळाली येथे आदर्श केंद्रप्रमुख म्हणून ते सेवानिवृत्त झाले आहेत. २०२१-२२ साली त्यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार तर २०२३-२४ चा आदर्श केंद्रप्रमुख म्हणून पुरस्कार मिळाला आहे. ३० एप्रिल रोजी ते सेवानिवृत्त झाले असून, झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी मनोज राऊत हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त शिक्षक बाळासाहेब गोरे, गटशिक्षणाधिकारी राजकुमार पाटील, विस्तार अधिकारी सुग्रीव नीळ, माजी सरपंच आशिष गायकवाड, सरपंच धनंजय शिंदे तसेच नगर जिल्हा शिक्षक संघाचे अध्यक्ष नारायण राऊत, म.रा.कुंभार समाजाचे सचिव विनायक राऊत, नगर जिल्हा कुंभार समाजाचे अध्यक्ष ज्ञानदेव कुंभार, करमाळा तालुका शिक्षक सोसायटीचे व्हा.चेअरमन तात्यासाहेब जाधव व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी गटविकास अधिकारी मनोज राऊत यांनी महादेव यादव गुरूजी यांच्या ३८ वर्षाच्या कामकाजाची प्रशंसा केली असून त्यांनी भविष्यात चांगले विद्यार्थी घडविण्यासाठी काम करावे; असे आवाहन केले.

> अत्यंत कठीण परिस्थितीतून शिक्षण घेऊन जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची नोकरी मिळाली. मिळालेल्या नोकरीमध्ये मी सर्व ठिकाणी प्रामाणिक काम करून चांगल्या पध्दतीने विद्यार्थी घडविण्याचे काम केले आहे. या कामामुळेच आदर्श मुख्याध्यापक व आदर्श केंद्रप्रमुख हे पुरस्कार मिळाले आहेत. भविष्यातही विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शन तसेच कुंभार समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणार आहे.
>
> **..महादेव यादव गुरूजी**

यावेळी विद्यार्थीनी भक्ती कदम व अश्विनी गोसावी यांची भाषणे झाली. तसेच प्रफुल्लता सातपुते, लहु गभाले, भैरू गभाले, प्रतिक्षा स्वप्नील यादव, दिपांजली महादेव यादव यांची भाषणे झाली. यावेळी यादव गुरूजी यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. या समारंभानिमित्त यादव गुरूजी यांनी शाळेला भाषणासाठी आवश्यक असलेला डायस भेट दिला. सुत्रसंचालन राजकुमार खाडे यांनी केले. आभार निलेश कुलकर्णी यांनी मानले

# जयप्रकाश बिले पब्लिक स्कुलचे भारतीय अभिरूप परीक्षेत यश

करमाळा(सं.प्र.): भैरवनाथ प्रतिष्ठान संचलित जयप्रकाश बिले पब्लिक स्कुल झरे शाळेच्या विद्यार्थ्यांनी भारतीय अभिरूप परीक्षा (IAS) या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. या परीक्षेत इ.१ ली मधील विघ्नेश दत्तात्रय कादगे याचा केंद्रात प्रथम आहे. इ.२ री मधील निर्मित अनिल साळुंके याचा प्रथम तर अन्वी निरंजन घोरपडे हिचा तृतीय क्रमांक, ध्रुव शरद जाधव याचा चौथा क्रमांक आणि उत्कर्ष श्रीपाद मंजरतकर याचा पाचवा क्रमांक आला आहे. इ.४ थी मधील प्रांजल बाळासाहेब गुळवे हिचा तृतीय तर धैर्यशील युवराज बिले याचा चौथा क्रमांक आला आहे. इंग्रजी माध्यमातून एकमेव अवघड परीक्षा म्हणून या परीक्षेचा उल्लेख केला जातो. या परीक्षेसाठी जयप्रकाश बिले पब्लिक स्कुल मधून पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. ही परीक्षा खूप पारदर्शी व अवघड मानली जाते. या परीक्षेतून केंद्राच्या मेरिट लिस्ट मध्ये तालुक्यातून सर्वात जास्त जयप्रकाश बिले पब्लिक स्कुलचे सात विद्यार्थी आले आहेत.

जयप्रकाश बिले पब्लिक स्कुल हे एकमेव करमाळा तालुक्यातील शाळा आहे जी अभिरूप परीक्षा मुलांसाठी आयोजित करते. यातून मुलांना आत्तापासूनच स्पर्धा परीक्षेची सवय लागते. मुलांच्या यशस्वी कामगिरीमुळे शाळेची शैक्षणिक गुणवत्ता उंचावलेली दिसत आहे. संस्थेचे अध्यक्ष जयप्रकाश बिले यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक केले आहे.

# मुस्लिम विकास परिषदेच्या वतीने खतना कॅम्प - १५८ बालकांचा सहभाग




करमाळा(सं.प्र.) : दरवर्षीप्रमाणे यंदाही मुस्लिम विकास परिषदेच्या वतीने मुस्लिम समाजातील लहान बालकांचे खतना कॅम्प नालबंद हॉल येथे संपन्न झाले. यामध्ये १५८ मुस्लिम बालकांची खतना स्पेशालिस्ट डॉ.उजेर बेग (सोलापूर) यांचे हस्ते शस्त्रक्रिया करण्यात आली; अशी माहिती मुस्लिम विकास परिषदेचे अध्यक्ष फारूक जमादार यांनी दिली. मौलाना सिकंदर अन्वर यांचे प्रमुख उपस्थितीत प्रार्थना करून खतना कॅम्पला सुरूवात झाली. यावेळी मौलाना मोहसीन म्हणाले, की इस्लाम धर्मात खतनाला विशेष महत्व आहे. मुस्लिम विकास परिषदेच्या वतीने दरवर्षी कॅम्प राबवून मुस्लिम समाजातील बालकांची एक उत्तम सोय केली जात असून, यात प्रचंड प्रमाणात पैशाची बचत करण्यात येते. असे दरवर्षी कॅम्प राबवून मुस्लिम समाजातील बालकांची सोय करण्यात यावी; असे आवाहन केले. या कॅम्पला मुस्लिम समाजाचे अध्यक्ष हाजी उस्मानशेठ तांबोळी, राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक सेलचे माजी जिल्हाध्यक्ष ॲड.वजीर शेख, सावंत गटाचे नेते सुनील सावंत, माजी नगरसेवक अल्ताफशेठ तांबोळी, संजय सावंत, ॲड.नईम काझी, सूरज शेख, मुस्तकीन पठाण आदींनी भेट दिली. यावेळी चांद हाजी फारूक बेग, बकशभाई शेख, जावेद शेख, समीर शेख, शाहरूख शेख, असीम बेग, समीर दाऊद शेख, आयान बेग उपस्थित होते. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी अरबाज बेग, फिरोज बेग, तौफिक शेख, जमीर मुलाणी, हमीद सय्यद, इरफान मिर्झा, पप्पू पठाण, आफताब पठाण, शाहीद बेग, नदीप शेख,नवाज बेग, साहिल शेख, अमन शेख आदींनी परिश्रम घेतले

॥ तुमचा विश्वास आमची जबाबदारी ॥

आमच्याकडे
ऐरटिगा गाडी
योग्य दरात
भाड्याने मिळेल




संपर्क
सुनील दौंडे(मेजर)
मो.9723521400
मो.8080760494

पत्ता
आण्णासाहेब जगताप हायस्कुल समोर, बायपास रोड जवळ, सिंचननगर, करमाळा.

श्री गजानन अगरबत्ती



- सुगंधी अगरबत्ती • कापूर
- अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
- विविध कलरची रांगोळी
- सर्व प्रकारचे लोबन,
- सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य

योग्य दरात मिळेल !



पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

# सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेसाठी ५ मे पर्यंत अर्ज करावेत : संतोष राऊत

करमाळा(सं.प्र.) : सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना अंतर्गत अभिनव भारत समाजसेवा मंडळ सालसे यांचे वतीने ज्या मुलांचे आई किंवा वडील मयत आहेत; अशा एकल पालकांच्या मुलांना शासनाच्या या योजने अंतर्गत ० ते १८ वयोगट पर्यंत शासनाकडून दरमहा २२५० रू. मदत मिळणार आहे. त्यासाठी लवकरात लवकर दिलेल्या पत्त्यावर ५ मे पर्यंत आपल्या मुलांचे अर्ज जमा करावेत; असे आवाहन अभिनव भारत समाजसेवा मंडळाचे अध्यक्ष संतोष राऊत यांनी केले आहे. अर्ज दाखल करताना मुलांचे दोन आयडी फोटो, मुलांचे व पालकाचे एकत्रित घरासमोरील फोटो, मृत्यू दाखला, बँक पासबुक, मुलांचे जन्म दाखला/बोनाफाईट, मुलांचे आधारकार्ड, सांभाळ करणाऱ्या पालकाचे आधारकार्ड, रेशनकार्ड, उत्पन्नाचा दाखला, शासकीय योजनेचा लाभ न घेतल्याचे हमीपत्र आदी कागदपत्र आवश्यक आहेत. या योजनेसाठी एकाच कुटूंबातील दोन मुलांचे प्रस्ताव देता येतील. सदर अर्ज १) सारीका पवार (८४३२८४३१७६) दत्तमंदिर शेजारी, करमाळा. २) विनायकल सालगुडे, (९५२७९५३७०७), तुषार घोलप (८३२९२०००७४) अभिनव भारत समाजसेवा मंडळ, सालसे येथे जमा करावेत.

## श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी निमित्त

# ३० एप्रिल पासून अखंड नामजप यज्ञ सप्ताह सुरू - ६ मे ला सांगता



करमाळा(सं.प्र.) : अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरूपीठ व अष्टपीठाचे पिठाधीश आण्णासाहेब मोरे यांचे आशिर्वादाने व चंद्रकांत मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी निमित्त श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र गणेशनगर, करमाळा अंतर्गत ३० एप्रिल पासून अखंड नामजप यज्ञ सप्ताह सुरू झाला असून या सप्ताहाची सांगता ६ मे ला होणार आहे.

हा सप्ताह रयत भवन, कृषी उत्पन्न बाजार समिती, भाजी मंडई आवार, नगररोड, करमाळा येथे चालू आहे. या सप्ताहात दररोज सकाळी ८.३० ते १०.३० या वेळेत सामुदायिक गुरूचरित्र पारायण सुरू आहे. सप्ताह कालावधीत प्रहर सेवा संपन्न होणार असून यामध्ये सकाळी ८ ते रात्री ८ यावेळेत महिला व रात्री ८ ते सकाळी ८ या वेळेत पुरूष सहभागी असतात. प्रहर सेवा म्हणजे दोन सेवेकरी विना वादन, दोन सेवेकरी स्वामी चरित्र सारामृत ग्रंथाचे पठन व दोन सेवेकरी श्री स्वामी समर्थ या मंत्राचा तुळशीच्या माळेवर जप ही सेवा एका सेकंदाचा ही खंड न पडू देता पुर्ण सप्ताह कालावधीत करत असतात. प्रहर सेवेत सहभागी होणाऱ्या भाविकांचे अनेक स्वरूपाचे प्रश्न मार्गी लागण्यासाठी श्री स्वामी समर्थ महाराज यांचे आशिर्वाद प्राप्त होत असतात. त्यानंतर सप्ताह कालावधीत रोज हवनयुक्त गणेश याग, स्वामी याग, चंडी याग, रूद्र याग, मल्हारी याग, गिताई याग यासारखे वेगवेगळे याग सेवा संपन्न होणार आहे. तरी या कार्यक्रमात करमाळा शहरातील जास्तीत जास्त भाविकांनी या सेवेमध्ये सहभागी व्हावे; असे आवाहन श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र गणेशनगर यांचे वतीने करण्यात आले आहे.

# राशिनपेठ येथील नंदकुमार चिवटे यांचे अल्पशा आजाराने निधन



करमाळा(सं.प्र.): करमाळा शहरातील राशिनपेठ येथील रहिवाशी नंदकुमार भिमाशंकर चिवटे (वय-५५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा, चार भाऊ असा परिवार आहे. कमलादेवी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष व माजी नगरसेवक सोमनाथ चिवटे यांचे ते बंधू होते. त्यांचे अंत्यविधी प्रसंगी सर्व स्तरातील नागरीक उपस्थित होते.

श्रीजय नेत्र रूग्णालय (डोळ्यांचा दवाखाना), करमाळा.
करमाळा मेडिकोज गिल्ड व करमाळा तालुका मेडिकल प्रॅक्टीशनर्स असो; यांचे संयुक्त विद्यमाने.. महाराष्ट्र दिनानिमित्त
मोफत डोळे तपासणी शिबीर व अल्प दरात (लेन्सच्या) मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर
मोतीबिंदू शस्त्रक्रिया रू.६०००/- पासुन सुरू (कालावधी एक महिन्यापर्यंत)
शिबीर : रविवार, दि.५/५/२०२४ रोजी सकाळी १०.३० ते सायं ५.०० पर्यंत
स्थळ : श्रीजय नेत्र रूग्णालय, श्री कमलादेवी रोड, कृष्णाजीनगर, करमाळा.
संपर्क : 9834071218, 9921013493
डॉ.भाग्यश्री रामकृष्ण नायकुडे M.S.(Ayu.) Gold Medalist (नेत्रतज्ञ व शल्य चिकित्सक)
श्रीजय ऑप्टिकल अल्प दरात चष्मे तयार करून मिळतील.

विघ्नहर्ता इंटिरीयर
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी मो.9028075051
करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
देवी प्लायवुड अँड हार्डवेअर
• प्लायवुड • किचनट्रॉली • वॉलपेपर
• हार्डवेअर • फेब्हिकॉल • वुडन फ्लोरींग • सनमायका
प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252
पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर

# चव्हाण महाविद्यालयातील अकरावी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचा निकाल

## तीनही शाखेत मुलींनी मारली बाजी



करमाळा(सं.प्र.) : विद्या विकास मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात अकरावी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचा निकाल जाहीर झाला असून, या तीनही शाखेत मुलींनी बाजी मारली आहे. कला शाखेचा निकाल ९६.८६ टक्के, वाणिज्य शाखेचा निकाल ९७.३० टक्के तर विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला आहे. कला शाखेमध्ये पुजा राजेंद्र गोरे (९३.१७ टक्के), स्नेहल आवटे (८६.६७ टक्के), समृध्दी नितीन चव्हाण (८२.५० टक्के) यांचे अनुक्रमे प्रथम, व्दित्तीय व तृतीय क्रमांक आले आहेत. वाणिज्य शाखेत मानसी वासानी (९४.८३ टक्के), सायली दत्तात्रय साळुंके (९३.०० टक्के), आदिती दत्तात्रय ढवळे (९२.६७ टक्के) यांचे अनुक्रमे प्रथम, व्दित्तीय व तृतीय क्रमांक आले आहेत. विज्ञान शाखेत प्रांजली नितीन घोगरे (९७.६७ टक्के), मंजुषा नायकलवाडीया (९६.३३ टक्के), भक्ती सतीश कोंढलकर (९५.८३ टक्के) यांचे अनुक्रमे प्रथम, व्दित्तीय व तृतीय क्रमांक आले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ महाविद्यालयाच्या विजयश्री सभागृहामध्ये संपन्न झाला. यावेळी प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलींद फंड, उपप्राचार्य संभाजी किर्दाक यांचेसह सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन सचिव विलासराव घुमरे यांनी केले.

## उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत

# रिटेवाडी उपसासिंचन संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी बहिष्कार घेतला मागे



करमाळा(सं.प्र.): येथील रिटेवाडी उपसा सिंचन संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन सिंचनासंदर्भातील व्यथा मांडल्या. या मागणीसाठी २२ गावातील नागरीकांनी मतदानावर बहिष्कार टाकला होता. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपण स्वत: लक्ष घालून रिटेवाडी उपसासिंचन योजना मार्गी लावू; असे आश्वासन दिले. मात्र निवडणूक लोकशाहीतील सर्वात मोठा उत्सव असतो आणि मतदान हा तर आपला मुलभूत अधिकार आहे; असे सांगत बहिष्कार मागे घेण्याचे आवाहन सुध्दा केले. उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत बहिष्कार मागे घेत असल्याचे गावकऱ्यांनी सांगितले. यावेळी काही गावातील सरपंच तसेच भाजपा महिला प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल उपस्थित होत्या.

# बहिणीला का मारतो म्हणून त्रयस्थ दोघांकडून मारहाण

करमाळा (सं.प्र.) : बहिणीला का मारतो असे म्हणून गावातील त्रयस्थ दोघा जणांनी भावास दगडाने व लाकडाने बेदम मारहाण केली आहे. हा प्रकार २९ एप्रिलला पहाटे तीनच्या सुमारास घडला आहे. यात सागर दत्तात्रय सावंत (रा.ढोकराई, ता.श्रीगोंदा) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की आमचे मुळगाव पांगरे असून, दरवर्षी यात्रेला गावाकडे येतो. यावर्षी २८ एप्रिलला रात्री पांगरे येथे असताना माझी बहिण घरातून एकटीच जात असताना तिला मी घराबाहेर जावू नको, असे म्हणालो. त्यावेळी ती न ऐकता घराच्या बाहेर जात असता, तीला मी चापट मारली. त्यानंतर गावातील शिवदास फरतडे व शिवाजी गुटाळ यांनी तु बहिणीला का मारले म्हणून चाकूने, बांबूने व दगडाने मारहाण करून जखमी केले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# यात्रेतील छबिन्यात धक्का दिल्याने तिघांकडून एकास बेदम मारहाण

करमाळा(सं.प्र.): पांगरे येथील यात्रेत छबिन्यासमोर मिरवणुकीत नाचताना धक्का लागल्याने तिघाजणांनी मारहाण केली आहे. हा प्रकार २९ एप्रिलला पहाटे अडीचच्या सुमारास पांगरे येथे घडला आहे. यात शिवदास महादेव फरतडे (रा.पांगरे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की २८ एप्रिलला रात्री साडेनऊ वाजता गावच्या यात्रेत बॅन्जोसमोर नाचत असताना शिवाजी गुटाळ यास सागर सावंत यांनी धक्का दिला. त्यानंतर शिवाजी गुटाळ यांनी सागर सावंत यास मारहाण केल्यानंतर पळून गेला. त्यानंतर २९ एप्रिलला पहाटे अडीचच्या सुमारास सागर सावंत, दादा सावंत, सिता सावंत असे सर्व रा.पांगरे व एक अनोळखी इसम यांनी आम्हांस दगडाने व काठीने मारहाण करून जखमी केले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# गौंडरे शाळेतील सव्वाचौदा वर्षाच्या मुलीस फूस लावून पळविले

करमाळा(सं.प्र.) : दहावीच्या वर्गात गेलेल्या सव्वाचौदा वर्षाच्या मुलीस कोणीतरी अज्ञात इसमाने फूस लावून पळवून नेले आहे. हा प्रकार २९ एप्रिलला दिवसा घडला आहे. या प्रकरणी मुलीच्या वडिलांनी पोलीसात फिर्याद दिली आहे. या प्रकरणी मुलीच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, की माझी सव्वाचौदा वर्षाची मुलगी ही गौंडरे येथील माध्यमिक शाळेत शिक्षण घेत आहे. २९ एप्रिलला ती घरी असताना कोणीतरी अज्ञात व्यक्तीने तिला फूस लावून पळवून नेले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# शरद पवारांनी वारे यांचे घरी घेतले स्नेहभोजन





करमाळा(सं.प्र.) : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांचे प्रचार सभेसाठी खुद्द शरद पवार यांची सभा झाली. त्यानंतर खासदार पवार यांनी राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष संतोष वारे यांचे घरी भेट देवून स्नेहभोजन घेतले. सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या घरी भेट देणे हे पवारांचे वेगळेपण असल्याने त्याची सर्वत्र चर्चा आहे. विशेष म्हणजे वारे यांनी पवार घरी येणार आहेत. हे शेवटपर्यंत गुपित ठेवले होते.अनेक पत्रकारांना सुध्दा याबाबत माहिती नव्हती. यावेळी पवार यांनी वारे कुटूंबाची कुटूंबातील सदस्याप्रमाणे सर्वांशी चर्चा केली. यावेळी माजी जि.प.सदस्या राणी वारे, यशराज वारे, संतोष वारे, संदीप वारे यांनी स्वागत केले. याप्रसंगी विजयसिंह मोहिते-पाटील, अभय जगताप, नारायण पाटील, वैभवराजे जगताप, प्रताप जगताप, देवानंद बागल आदी उपस्थित होते. राणी वारे, सुप्रिया तनपुरे व राजश्री कदम यांनी पवार यांचे औक्षण केले.

> सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या घरी येऊन स्नेहभोजन घेतले यातच आम्हाला सर्वकाही मिळाल्यासारखे आहे. ना.पवार यांनी कुटूंबातील सर्वांशी चर्चा केली. त्यामुळे आम्ही भारावून गेलो होतो. त्यांचे प्रेम व उत्साह पाहून आम्ही आनंदीत झालो आहोत. त्यांनी आमचे घरी भेट दिल्याने आम्हांला आणखी काम करण्याचे बळ मिळाले आहे.
>
> **....संतोष वारे** (ता.अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस)


## मेहेर आय & डेंटल हॉस्पिटल

डोळ्यातील मागील पडद्याच्या(रेटीना) विविध आजारांवर तपासणी, उपचार व मार्गदर्शनासाठी कर्जत तालुक्यातील प्रथमच **'डोळ्यातील पडद्याचे (रेटीना) स्पेशालिस्ट'**

**डॉ.क्षितीज तांबोळी** MBBS, MS., F.V.R.S.

**रविवार दि.५/५/२०२४ रोजी करमाळा शहरात येणार आहेत.**

**खालील आजारांवर मार्गदर्शन व उपचार :** ● चष्म्याचा मोठा नंबर(मायनस/प्लस) या रूग्णांच्या पडद्याची नियमित तपासणी ● डायबिटीस(मधुमेह) व ब्लडप्रेशर (रक्तदाब) या आजारांमुळे डोळ्यातील पडद्यावर दुष्परिणाम होतात. त्याची नियमित तपासणी ● कमी दिवसांमध्ये जन्म झालेली बालके यांच्या डोळ्यातील पडद्याची नियमित तपासणी. ● पडदा सरकणे, पडद्याच्या समोर रक्तस्त्राव होणे. ● पडद्यावरील रक्तवाहिन्या ब्लॉक होणे यावर उपचार. ● मेंदूच्या नसेचे सर्व आजार

**अधिक माहिती व नांवनोंदणीसाठी संपर्क : मो.+91 7875619696**

**पत्ता : शिंदे ॲक्सिडेंट हॉस्पिटल जवळ, शाहुनगर, करमाळा.**

टीप : डॉ.क्षितीज तांबोळी हे दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी मेहेर आय ॲन्ड डेंटल हॉस्पिटल मध्ये उपलब्ध !


# 'माझं शेटफळ नागोबाचे' या पुस्तकाचे प्रकाशन



करमाळा(सं.प्र.): नागोबाचा सांभाळ करणाऱ्या शेटफळ गावाविषयी पत्रकार गजेंद्र पोळ लिखत माझं शेटफळ नागोबाचे या पुस्तकाचे प्रकाशन पंढरपूर येथील वासकर फडाचे प्रमुख ह.भ.प.राणा महाराज वासकर यांचे हस्ते झाले. देशातील आगळे-वेगळे वैशिष्ट्ये असलेल्या शेटफळ(नागोबाचे) या गावाविषयी अभ्यासकांबरोबरच अनेकांच्या मनामध्ये कुतूहल आहे. या ठिकाणी राज्यातूनच नव्हे तर देशातून परदेशातून नागरीक येऊन माहिती घेत असतात. या गावाविषयी अधिक माहिती लोकांना मिळावी यासाठी पत्रकार गजेंद्र पोळ यांनी लिहिलेल्या व जिव्हाळा ग्रुप प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या माझं शेटफळ नागोबाचे या पुस्तकाचे प्रकाशन केले. यावेळी कीर्तनकार ह.भ.प.विठ्ठल पाटील महाराज, आप्पा जाधव महाराज, आनंद जाधव महाराज, विलास राठोड महाराज आदी मान्यवरांसह राजाभाऊ रोंगे, विलास पोळ, वैभव पोळ, नानासाहेब साळुंके, प्रशांत नाईकनवरे, राजेंद्र साबळे, विजय लबडे, साहेबराव पोळ, जोतीराम जाधव, बाळासाहेब पोळ व ग्रामस्थ उपस्थित होते. या पुस्तकाला ज्येष्ठ पत्रकार ॲड.डॉ.बाबूराव हिरडे यांनी प्रस्तावना दिली असून गावच्या धार्मिक वैशिष्ट्यांबरोबरच गावातील व परिसरातील इतर मंदिरे, गावातील सण, उत्सव, शेती याविषयी माहिती दिली आहे.

# मोटारसायकल-टँकरच्या धडकेत मामा-भाचे ठार

करमाळा(सं.प्र.): नातेवाईकाच्या लग्नाला जात असताना मोटारसायकल व पाण्याच्या टँकर सोबत झालेल्या धडकेत करमाळा तालुक्यातील मामा-भाचे ठार झाले आहेत. या प्रकरणी टँकर चालकावर कर्जत (जि.अ.नगर) पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा प्रकार २८ एप्रिल रोजी दुपारी दीडच्या सुमारास करमाळा-कर्जत रस्त्यावर कोरेगाव शिवारात राधेशाम मंगल कार्यालय पासून काही अंतरावर घडला आहे. सदरच्या अपघातात हिंदराज फुलचंद हाके (वय-३०) व अमित रामदास सुळ (वय-१४) असे मामा-भाचे मयत झाले आहेत. या प्रकरणी नारायण बाळासाहेब गरड (रा.निंबोडी, ता.कर्जत) यांचेवर कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी, की अमित हा संगोबा येथील शाळेत शिक्षण घेत आहे तर मामाच्या गावी तालीम करीत होता. हिंदराज सोबत भाचा अमित ह खांबेवाडी येथे राहण्यास होता. रविवारी कर्जत तालुक्यामध्ये नातेवाईकाच्या लग्नासाठी दोघेजण मोटरसायकलवर लग्नासाठी निघाले होते. दरम्यान दुपारी दीडच्या सुमारास पाण्याचा टँकर वाहणाऱ्या ट्रॅक्टर सोबत हिंदराज हाके यांच्या मोटरसायकलची धडक झाली. अपघात एवढा जोराचा होता की, भाचा अमित हा जागीच ठार झाला तर हिंदराज हाके यास पुणे येथे उपचारासाठी नेण्यात आले. त्या ठिकाणी उपचार दरम्यान हिंदराजचा मृत्यू झाला. सदर घटनेची माहिती करमाळा तालुक्यात मिळताच सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. सदर घटनेची तक्रार दिल्यानंतर चालकावर गुन्हा दाखल झाला आहे.

## ब्राह्मण महासंघाच्या वतीने सामुदायिक व्रतबंध संस्कार सोहळा



करमाळा(सं.प्र.) : ब्राह्मण महासंघ श्रीदेवीचामाळ यांचे वतीने सामुदायिक व्रतबंध संस्कार सोहळा पार पडला. यामध्ये २१ ब्राह्मण मुलांचे उपनयन संस्कार करण्यात आले. या कार्यक्रमास बटु मुलांचे कुटूंब तसेच त्यांचे पाहूणे व करमाळा तालुक्यातील मान्यवर उपस्थित होते. तब्बल दीड हजार पाहुण्यांची भोजन व्यवस्था करण्यात आलेली होती. आलेल्या बटूंना तांब्याची पळी, पंचपात्र, ताम्हण तसेच सोवळे देण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ब्राह्मण महासंघाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. अशाच सामाजिक बांधिलकीतून पुढील काळात अनेक कार्यक्रम करण्यात येणार असल्याचे ब्राह्मण महासंघाचे अध्यक्ष बाळासाहेब होसिंग यांनी सांगितले.

## भारत हायस्कुलचे माजी प्राचार्य बाळकृष्ण शिंदे यांचे निधन



करमाळा(सं.प्र.): जेऊर येथील भारत हायस्कुलचे माजी प्राचार्य व ॲड.सविता शिंदे यांचे पिताश्री बाळकृष्ण शिंदे (वय-७६) यांचे वृध्दपकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, तीन मुली, दोन मुले, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कुंभेज येथे त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व स्तरातील नागरीक उपस्थित होते.

## शाळा पूर्वतयारी मेळावा विद्यार्थी गुणवत्तेस उपयुक्त : मुख्याधिकारी सचिन तपसे



करमाळा(सं.प्र.) : शाळा पूर्व तयारी मेळावा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची शारिरीक, भावनिक, मानसिक, बौध्दीक, सामाजिक स्थिती लक्षात घेऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने पालक व शिक्षकांना नक्कीच उपयुक्त ठरेल; असे मत करमाळा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन तपसे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभागाच्या वतीने सन २०२४-२५ या नवीन शैक्षणिक वर्षात संपूर्ण राज्यात इ.१ ली मध्ये दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शाळा पूर्व तयारी मेळावा अंतर्गत विद्यार्थ्यांचे पहिले पाऊल हा उपक्रम राबविला जात आहे. त्यानुसार न.पा.शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे यांच्या मार्गदर्शक सुचनेनूसार कै.साधनाबाई नामदेवराव जगताप प्राथमिक मुलींची शाळा नं.१ येथे शाळा पूर्व तयारी मेळावा संपन्न झाला. त्यावेळी मुख्याधिकारी तपसे बोलत होते. यावेळी नवागत विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे मान्यवरांच्या व सर्व शिक्षकांच्या उपस्थितीत गुलाबपुष्प, फुगे देऊन स्वागत व अभिनंदन केले. कार्यक्रमाचे उद्‌घाटन मुख्याधिकारी तपसे यांचे हस्ते झाले. यावेळी मुख्याध्यापक तथा केंद्रसमन्वयक दयानंद चौधरी, लेखापरिक्षक विनोद राखुंडे, सेवानिवृत्त आरोग्य अधिकारी जब्बार खान उपस्थित होते. सुत्रसंचालन संध्या शिंदे यांनी केले तर उपस्थितांचे आभार रमेश नामदे यांनी मानले. कार्यक्रमास नवीन प्रवेशित मुलींचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुवर्णा वेळापूरे, सुनिता क्षीरसागर, मोनिका चौधरी, तृप्ती बेडकुते, भाग्यश्री पिसे, भालचंद्र निमगिरे, निलेश धर्माधिकारी यांनी परिश्रम घेतले.

Reg No : F-31904

ईशा पॅरामेडिकल ॲन्ड एज्युकेशनल इन्स्टिट्यूट, करमाळा.

Affiliated By :- Engineering & Management Institute of India Under the Department of Higher Education Ministry Of Education Gov. of India (MHRD code : S-21363)

इंजिनिअरींग व टेक्नीकल क्षेत्रात करिअर घडविण्याची सुवर्णसंधी !

Eligibility for Technical Courses
Duration : 3 years (6 Semester),
Qualification : 10th or Eq.
Duration : Lateral Entry 2 yrs. (4 Semester)
Qualification : 12th PCM / ITI

ADMISSION OPEN

- Diploma in Civil Engineering
- Diploma in Computer Eng.
- Diploma in Electrical Eng.
- Diploma in Computer Science
- IT & Management



आरोग्य क्षेत्रात करिअर घडविण्याची सुवर्णसंधी !

ADMISSION OPEN

Affiliated By :- Lal Bahadur Shastri Paramedical Council Under the Department of Higher Education Ministry Of Education Gov. of India (MHRD code : S-21267)



Eligibility For Paramedical Courses
Qualification : 12th Science

- Optometry
- D.M.L.T.
- Diploma in Sanitary Inspector
- Diploma in X-ray Technician
- Diploma in Dialysis Technician
- All Paramedical Course Available

कॉलेजची खास वैशिष्ट्ये : • सुसज्ज इमारत • तज्ञ शिक्षक वृंद • प्रॅक्टीकलसाठी लॅब • १००% जॉब प्लेसमेंट

■ शिष्यवृत्ती योजना उपलब्ध
■ लिमिटेड सीट तरी आजच आपला प्रवेश निश्चित करा !

पत्ता : सोलंकर बिल्डींग, नगर रोड, बायपास, मॉडर्न जिम, २ रा मजला, करमाळा (९९७०९३०१५३, ९७३००३३१२४)


सोने खरेदीवर
चांदी फ्री...
ऑफर सोन्याच्या २२ व २३ कॅरेट दागिने खरेदीवर लागू.
ऑफर कालावधी
१० मे २०२४ पर्यंत...
सुवर्णसंचय योचना 12 = 13
असंख्य व्हरायटी मध्ये सर्व
प्रकारचे दागिने उपलब्ध...
शुभ अक्षय तृतीया
* नियम व अटी लागू. *
AJK
Anandi Jewellers
आनंदी ज्वेलर्स
मेनरोड, जय महाराष्ट्र चौक, करमाळा • फोन (०२१८२)२२२२०९ मो.९४२०९१५०९९


6 May 2024
३९ वे पुण्यस्मरण
मरणोत्तरही लाभले भाग्य
तुम्हाला अमरत्वाचे ।
श्रम-महर्षि लाभे उपाधी,
जाहले सार्थक जीवनाचे ।।
आमच्या संस्थेचे संस्थापक, माजी आमदार व स्वातंत्र्यसैनिक
देशभक्त नामदेवरावजी जगताप साहेब
३९ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त आपल्या पवित्र स्मृतीस..
भावपूर्ण आदरांजली !
अभिवादक
विद्या विकास मंडळ संचलित
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय
करमाळा, जि.सोलापूर
यशवंत परिवार
करमाळा, जि.सोलापूर